अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# गणराज रंगी नाचतो......

श्रीगजाननाची प्रार्थना करताना 'वक्रतुंड महाकाय, सूर्यकोटी समप्रभ, निर्विघ्नं कुर्मे देव, सर्वकार्येषू सर्वदा' अशा प्रकारचे वंदन केले जाते. ज्या गणपतीकडे सहस्त्रकोटी सूर्याचे तेज आहे. त्याने प्रत्येक कार्य निर्विघ्नपणे पार पाडावे. अशा गजाननाला प्रत्येक कार्याच्या आधी नमस्कार करण्याची परंपरा आहे. सगळ्या कार्याच्या आधी किंवा उपक्रमाच्या आधी गणेशाला प्रार्थना का करायची. हेही एकदा नीट समजून घेतले पाहिजे. आज तर याच विघ्नविनाशक मोरयाचा गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पडावा म्हणून त्यालाच प्रार्थना करण्याची वेळ येते. आपल्या भक्तांनीसुध्दा नको त्या गोष्टींचा आग्रह धरू नये आणि उत्सवात विघ्ने आणू नयेत अशीच त्या विघ्नहर्त्याची इच्छा आहे. भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक असलेला गणेशोत्सव महाराष्ट्राच्या सार्वजनिक उत्सवांमधला मानबिंदू ठरतो. आजपासून सगळा महाराष्ट्र गणेशभक्तीच्या रसामध्ये आकंठ डुंबून जाईल. श्रीगणेशाची ती आराधना किंवा भक्ती आपल्या इच्छापूर्ती व्हावी यासाठी जरी केली जात असली तरीसुद्धा या दहा दिवसांमध्ये यानिमित्ताने अधिकाधिक मंगलमय वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होतो. पुराणकाळापासून श्रीगणेशाची आराधना आणि उपासना सांगितली गेली. अगदी देवदेवतांनीसुध्दा या गणांचा अधिपती असलेल्या गणपतीचे महत्त्व मान्य करून त्याच्या शक्तीला नमस्कार केलेला पहायला मिळतो. त्याहीपेक्षा रिध्दीसिध्दी आणि बुध्दी देणारा हा श्रीगणेश सामान्यांपासून ते असामान्यांपर्यंत किंवा निर्बुध्दापासून ते बुद्धिवंतांपर्यंत सगळ्यांनाच प्रेरणा देतो. श्रीगणेशाविषयी वाटणारी आपुलकी भक्तीच्या माध्यमातून व्यक्त होते. आणि ही भक्ती म्हणजेच समाजाला आवश्यक असलेल्या एका मंगलमय भावनेचे आवर्तन असते. कोणतीही गोष्ट चिरंतन टिकायची असेल तर त्यासाठी तसाच भासही हवा असतो. भारतीय संस्कृती ही भक्तीचा ध्यास घेऊन उभी राहिली म्हणून आज ती हजारो वर्षांनंतरही टिकू शकली. गणेशोत्सव हा अशाच एका भक्तीचा आणि उपासनेचा प्रभावी मार्ग ठरला. शेवटी श्रध्दा भक्ती या सगळ्या गोष्टी प्रत्येक व्यक्तीच्या अनुभवावर आधारित असतात. त्याच्या मनाला मिळणाऱ्या समाधानातून आनंदातून त्या वाढत असतात. एवढेच नव्हे तर जगण्याच्या या सगळ्या प्रवासामध्ये हा भक्तिरस आत्मविश्वासाचे नवनीत देत असतो. हे नाकारता येणार नाही. आजपासून सुरू झालेला हा गणेशोत्सव पुढचे दहा बारा दिवस व्यक्तिगत आनंदाबरोबरच सामाजिक उत्साहाने भरलेला असेल. ठिकठिकाणी होणाऱ्या पूजा-अर्चा किंवा आरत्या दर्शनासाठी लागणाऱ्या लांबच लांब रांगा त्यातून ओसंडून वाहणारा उत्साह इतर कोणत्याच फुटपट्टीने मोजता येणार नाही. भावनिक समाधान आणि मनस्वी आनंद हेच त्याचे उत्तर ठरते.

### गणेशमंडळच एक सेवासंस्था

महाराष्ट्रामध्ये लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला यंदा बरोबर १२० वर्षे पूर्ण होत आहेत. तसे पाहिले तर भारतीय संस्कृतीतले सगळेच सण, उत्सव हे समाजाशी जोडले गेलेले दिसून येतात. पूर्वीच्या काळी याच भाद्रपद शुध्द चतुर्थीचा गणेशोत्सव घराघरात खाजगीरित्या साजरा होत होता. परंतु तेव्हादेखील गणेशमूर्ती तयार करणाऱ्या कलाकारापासून ते फुले आणि दूर्वा विकणाऱ्या विक्रेत्यांपर्यंत सर्वांनाच या उत्सवाचा वेगवेगळ्या माध्यमातून लाभ होत गेला. पारतंत्र्याच्या काळात घराघरात दडलेली ही अमूर्त भक्ती सामाजिक शक्तीच्या रूपात प्रकट करण्याची कल्पना लोकमान्यांना सुचली आणि त्यातून एका फार मोठ्या राष्ट्रीय हिताचे जतन होऊ शकले. पारतंत्र्यात लोकमान्यांनी जनजागृतीसाठी आणि परकियांचे हे विघ्न नाहीसे करण्यासाठी गणेशोत्सवाचा उपयोग होऊ शकतो. असे त्यांना जाणवले आणि या उत्सवाला एका लोकचळवळीचे स्वरुप प्राप्त झाले. आता काळ बदलला आहे. स्वातंत्र्यामध्ये साजरा होणारा गणेशोत्सव सामाजिक कार्यासाठी उपयोगात आला पाहिजे. भारतीय संस्कृतीच्या संस्कारांचे संवर्धन करण्यासाठी तो विकसित झाला पाहिजे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये किमान पन्नास एक हजार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे कार्यरत आहेत. उत्सवाच्या निमित्ताने त्यांच्याकडे गोळा होणाऱ्या कोट्यवधीच्या देणग्या या त्याच समाजाच्या विविध कामांकरता उपयोगात आणता येऊ शकतात. केवळ सेवाकार्य करणाऱ्या संस्थांना लोकांनी देणग्या दिल्या. म्हणजे गणेशोत्सवाचा हेतू सफल होत नाही. आमचे तर म्हणणे असे आहे की प्रत्येक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ हीच एक सेवासंस्था झाली पाहिजे. इतर सेवासंस्थांच्या मदतीला धावून जाण्यापूर्वी ज्या परिसरामध्ये किंवा ज्या गल्लीमध्ये हे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ कार्य करते तो परिसर त्या त्या गणेशोत्सव मंडळाला सामाजिक सेवेसाठी दत्तक घेता येऊ शकतो. तिथल्या स्वच्छतेपासून ते आपल्याच परिसरातल्या गरीब विद्यार्थ्यांच्या उत्कर्षासाठी गणपतीपुढे येणाऱ्या रकमेचा उपयोग करता येऊ शकतो. प्रत्येक गणेशोत्सव मंडळाने आपापल्या परिसरातील दहा गरीब कुटुंबांसाठी सहाय्याची योजना जरी तयार केली तर त्यातून कितीतरी मोठे कार्य उभे राहू शकते. सरकारनेदेखील या गणेशोत्सव मंडळांना कायमस्वरुपी सेवासंस्था म्हणून मान्यता दिली पाहिजे आणि त्यांच्या या उपक्रमांना सहकार्य केले पाहिजे.

### सामाजिक समजूतदारपणा वाढावा

दहा दिवसांचा हा उत्सव केवळ आरत्या म्हणण्यासाठी किंवा आपले नवस पूर्ण करण्यासाठी नाही. तर आपापल्या परिसरातल्या समस्या सोडवण्यासाठी या सामाजिक शक्तीचा उपयोग होऊ शकतो. लोकमान्य टिळकांना या उत्सवाला सार्वजनिक स्वरूप देताना याच गोष्टी अपेक्षित होत्या. सध्या त्याला येत असलेले कमर्शिअल किंवा व्यापारी स्वरुप उत्सवाचा हेतू नाहीसा करणारे ठरते. मग अगदी दहा दिवस लावले जाणारे कर्णकर्कश्श लाऊडस्पिकर त्यावरची चित्रविचित्र गाणी किंवा प्लास्टर ऑफ पॅरीसच्या मूर्ती बनवून पर्यावरणाकडे होणारे दुर्लक्ष या गोष्टीसुध्दा टाळल्या गेल्या पाहिजेत. गणपतीची आराधना करताना अथर्वशीर्षामध्ये सत्यं वच्मी, ऋतं वच्मी, अशा प्रकारचा उल्लेख आहे. याचा अर्थ सत्य आणि नित्य जे असेल त्याची उपासना करण्याचे आवाहन केले गेलेले आहे. उत्सवातून अध्यात्मिक साक्षरता वाढली पाहिजे. भक्तीच्या माध्यमातून व्यक्तीचा समजूतदारपणा वाढला पाहिजे म्हणजेच बुध्दीची प्रगल्भता आणि मनाची जाणीव व्यापक झाली पाहिजे. तरच समाजामध्ये असलेला अनाचार, भ्रष्टाचार रोखता येऊ शकेल. गणेशाकडे यासाठीच प्रार्थना करायची असते.